।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि १ जून २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक २३ वा

## सांगोला आगारास नवीन पाच बसेस

### चालक-वाहक व सामान्य प्रवाशी यांच्या हस्ते नवीन बसेसची पुजा



सांगोला : माजी आ.शहाजीबापू पाटील व आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी विधानसभेत गोरगरीब नागरीकांच्या प्रवासाची अडचण लक्षात घेऊन विधानसभेच्या अधिवेशनात नवीन एस.टी.बसेसची मागणी केलेली होती. तसेच एस.टी महामंडळाचे अध्यक्ष आमदार प्रताप सरनाईक यांच्या कडे सुध्दा पाठपुरावा केला होता.

माजी आ.शहाजीबापू पाटीलआमदार देशमुख यांच्या या मागणीचा विचार करुन राज्य सरकारने सांगोला आगारास नविन पाच बसेस दिल्या. त्या बसेसचे पुजन आमदार बाबासाहेब देशमुख यांच्या शुभहस्ते करण्याचे आयोजन आगार प्रमुखानी केले होते.आमदार देशमुख यांनी मात्र नवीन बसेसची पुजा सांगोला आगाराचे चालक वाहक व कर्मचारी यांच्या व सामान्य प्रवाशांच्या हस्ते करण्याच्या आगर प्रमुखांना सुचना दिल्या. आलेल्या नवीन पाच बसेसचे पुजन आमदार देशमुख यांच्या सुचनेनुसार सर्वसामान्य चालक-वाहक, कर्मचारी व प्रवाशी वर्ग यांच्या हस्ते झाले.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष येतनसिंह केदार,सागर पाटील,यशराजे साळुंखे-पाटील,जगदीश पाटील,गुंडादादा खटकाळे,यांचेसह आगार व्यवस्थापक,कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## जिल्हा परिषद शाळेमध्ये प्रवेश घेतलेल्या पाल्यांच्या पालकांना घरपट्टी माफ

### दिपकआबांच्या मार्गदर्शनाखाली जवळा ग्रामपंचायतीचा ऐतिहासिक निर्णय





सांगोला : स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषद शाळांना विद्यार्थी मिळणे आता अवघड झाले आहे. खासगी शाळांमध्ये मिळणाऱ्या सुविधा यामुळे पालक वर्गात आपल्या मुलांना खासगी शाळांमध्ये पाठवण्याचा कल वाढला आहे.या स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा टिकण्यासाठी आणि शाळा वाचविण्यासाठी सांगोला तालुक्यातील जवळा ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला आहे. यात जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतल्यास घरपट्टी कर माफ करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. जवळा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद मराठी शाळेमध्ये प्रवेश घेतलेल्या पाल्यांच्या पालकांना घरपट्टी माफ करण्याचा निर्णय ग्रामपंचायतचा ठराव घेऊन येथील मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच श्री.सज्जन मागाडे यांनी घेतला आहे.

ग्रामपंचायतीने पाणी व घरपट्टी माफ केली तर ग्रामपंचायतीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर घटणार आहे. तसेही शासनाकडून ग्रामपंचायतींना निधी कमी मिळत असून, पाणी पुरवठा, दिवाबत्ती, कर्मचाऱ्यांचे पगार, सामाजिक सेवा यांच्या खर्चाचा भार ग्रामपंचायतीवर आहे. अनेक ग्रामस्थ वर्षेनुवर्षे कर भरत नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतीचे उत्पन्न घटले तर सेवा देताना आर्थिक संकटांचा सामना ग्रामपंचायतींना करावा लागत असताना देखील जिल्हा परिषदेच्या शाळा खासगी शाळांच्या स्पर्धेत टिकाव्यात म्हणून जवळा ग्रामपंचायतीकडून मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच श्री.सज्जन मागाडे यांच्या नेतृत्वात ग्रामपंचायतीकडून झेडपी शाळांत शिकणाऱ्या पाल्यांच्या पालकांचे घरपट्टी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. पहिली ते चौथीपर्यंत मराठी शाळा सुरळीत सुरू होती. त्यातून अनेक विद्यार्थी घडले आहेत. मात्र, आजच्या स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषद शाळा बंद पडण्याच्या स्थितीत आल्या आहे.

शाळेत विद्यार्थी मिळणेदेखील कठीण झाले असून,जिल्हा परिषदेची शाळा कायम सुरू राहावी, यासाठी जवळा ग्रामपंचायतीने हा ऐतिहासिक निर्णय घेतला असून तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीनी सुध्दा असा आदर्श घ्यावा, असे मत मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी सरपंच सज्जन मागाडे, उपसरपंच नवाज खलिफा, मा.उपसरपंच बाबासाहेब इमडे, सोसायटीचे चेअरमन सुनिलआबा साळुंखेपाटील, मा.सरपंच बाळासाहेब गावडे, ग्रा.प.सदस्य अनिल सुतार उपस्थित होते.

## भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानापैकी एक : डॉ. सुधीर गवळी

### सांगोला नगरपरिषदेतर्फे संविधान उद्देशिका वाटप व आर्थिक साक्षरता शिबिराचे आयोजन



सांगोला : भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानापैकी एक असून संविधानाची उद्देशिका ही संविधानाचे सार असून सर्वांनी आपल्या घरात दर्शनीय भागात सदर उद्देशिकाची फ्रेम लावावी, असे आवाहन सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांनी केले.

सांगोला नगरपरिषदेतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला येथे भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल घर घर संविधान या कार्यक्रमांतर्गत भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या फ्रेमचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ.सुधीर गवळी यांचे हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले.

याचबरोबर नगरपरिषद अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी कोल्हापूर येथील धनवर्धन या संस्थेच्या संस्थापिका श्रीमती निर्मला कोळवणकर व सांगली येथील व्याख्याते श्री.संतोष सिरशीकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान ठेवण्यात आले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचारी वर्ग,बचत गटाच्या महिला व नागरिक उपस्थित होते.

श्री. सिरशीकर यांनी आर्थिक नियोजनाचे महत्त्व विषद करून म्युच्युअल फंड, एसआयपी व इतर माध्यमांत गुंतवणूक करून आर्थिक उद्दिष्ट कसे गाठू शकतो याबाबत सोप्या उदाहरणासह मार्गदर्शन केले. श्रीमती कोळवणकर यांनी लवकर गुंतवणुकीस सुरुवात केल्यास चक्रवाढ व्याजाचा जास्तीत जास्त फायदा घेऊन अधिकाधिक आर्थिक लाभ कसा मिळू शकतो, याबाबत मार्गदर्शन केले. यावेळेस उद्देशिकाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. श्री.. योगेश गंगाधरे यांनी सूत्रसंचालन केले तर श्रीमती प्रियांका पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

## माणगंगा भ्रमणसेवा संस्थेच्यावतीने वृक्षारोपण व संवर्धन भव्य खुल्या स्पर्धा

सांगोला : माणगंगा भ्रमणसेवा संस्थेच्यावतीने सांगोला तालुक्यातील माण नदीकाठावर वृक्षारोपण करुन वर्षभर त्या वृक्षांचे उत्कृष्ट संवर्धन करणाऱ्या वैयक्तिक ,व्यक्ती ,संस्था ,ग्रामपंचायत, माध्यमिक शाळा ,महाविद्यालय यांच्यासाठी खुल्या स्पर्धा आयोजित केल्या आहेत. सांगोला तालुक्यातील माणगंगा नदी काठावर पर्यावरण पूरक विविध प्रकारची यामध्ये वड, पिंपळ, चिंच, कडूलिंब, जांभळ, उंबर, करंज, देशी बाभळ, पळस यापैकी विविध प्रकारच्या दहा वृक्षांची लागवड करून वर्षभर उत्कृष्ट संवर्धन करणाऱ्या स्पर्धकांची निवड करून त्यांना प्रथम क्रमांकसाठी रोख रु. १० हजार, द्वितीय क्रमांकासाठी रोख रु. ७ हजार, तृतीय क्रमांकासाठी रोख रु. ३ हजार व प्रत्येक विजेत्यास सन्मान चिन्ह व गौरव पत्र मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार म्हणून देण्यात येणार आहे.

पुरस्कारासाठी माणगंगा नदी पात्राचे तीन टप्पे केले असून प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यामध्ये पहिला टप्पा खवासपूर ते अनकढाळ, दुसरा टप्पा वाटंबरे ते आलेगाव-बेले मळा व तिसरा टप्पा वाढेगांव ते मेथवडे याप्रमाणे राहणार आहे. माणनदीच्या काठावर वृक्ष लागवडीसाठी दोन फूट लांब, दोन फूट रुंद व दोन फूट खोल याप्रमाणे स्पर्धकांनी खड्डे काढावे. दोन खड्ड्यातील अंतर ७ मीटर ठेवावे. रोपे लागवडीची तयारी करून ज्या गावच्या ग्रामपंचायत हद्दीत वृक्षारोपण करणार आहे, त्या ग्रामपंचायतीकडे दि. ३० जून २०२५ पर्यंत प्रवेशपत्र भरून द्यावीत. ज्यांचे प्रवेश पत्र मुदतीत येईल अशा स्पर्धकांना संस्थेमार्फत विविध प्रकारची योग्य ती जास्तीत-जास्त १५ रोपे देण्यात येतील. परंतु स्पर्धेसाठी १० रोपे गृहित धरली जातील.

पुरस्कारासाठी निवड करताना जीवंत रोपांची संख्या, रोपावरील टवटवी, रोपांची झालेली वाढ, वृक्ष लागवड परिसरातील स्वच्छता, वृक्ष लागवडीच्या ओळीतील व समोरच्या नदीपात्रातील उपद्रवी वनस्पतीचे निर्मूलन इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातील. अशी माहिती माणगंगा भ्रमणसेवा संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे यांनी दिली. यासाठी तिन्ही टप्प्यात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचे सहकार्य घेतले जाईल. याबाबत जिल्हाधिकारी सोलापूर, तहसीलदार सांगोला, उप.अभियंता पाटबंधारे अधिकारी पंढरपूर, वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला, सामाजिक वनीकरण अधिकारी सांगोला, तालुका कृषी अधिकारी सांगोला, गटविकास अधिकारी सांगोला या सर्व कार्यालयांना माहितीसाठी कळविले असल्याचेही घोंगडे यांनी सांगितले.

# प्रजाजनासाठी धडपडणाऱ्या अहिल्यादेवी



अहिल्यादेवी स्वातँय भारतातील, माळव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मृत्युपर्यंत त्या तिथेच वास्तव्यात होत्या. मल्हाररावांनी त्यांना आधीच प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केल्यामुळे त्या धाडसी बनल्या होत्या. त्यामुळे त्यालढाईत स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

अहिल्याबाईंचे पती खंडेराव होळकर कुम्हटेच्या लढाईत मृत्यु पावल्यानंतर त्याकाळी सती जाण्याची प्रथा अस्तित्वात होती. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी विरोध केला. साम्राज्याचा कारभार सांभाळावा असे त्यांनी सुचविले. माळवा प्रांताचा कारभार बघत असतांना सासरे मल्हारराव होळकर यांचे देखील दु:खद निधन झाले. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाई दरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा, तेथे तुम्ही ४-५ दिवस मुक्काम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांच्या शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा

पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्य कारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्यांचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला, तो एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. तिच्या चांगल्या बुध्दिचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्यादेवी ही एक महान स्त्री होती.

आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना तत्त्वज्ञानी राणी असे संबोधतात. याचा संदर्भ बहुतेक तत्त्वज्ञानी राजा भोज यांच्याशी असावा.

अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे. वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती व युक्तीने मारले जाऊ शकतात, परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यावरच ते मरते. एकदा त्याच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते, असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे.

भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना नेमले. त्यामुळे भिल्ल जमाती होळकराच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक) माल्कम यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी त्यांच्या सवयींवर लक्ष ठेवले.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्याकाळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्त्व व्यावहारिक नीती नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजून घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या. शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

मातोश्रींची लोककल्याणाची कीर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री पंडीत, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यांनाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती . ग्रंथ संपदा- निर्मिती छापखाने नसल्याने त्याकाळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते वरच अवलंबून राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्याप्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्येची महत्त्व जाणत असल्याने त्यांच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले.

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट प्रथा कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणांस येते. त्याकाळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, यवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखलं प्रसिंध्द हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोकं या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेसाठी कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. तर अहिल्यादेवींच्या सर्वांना समान न्याय या विचाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होता, त्यास चाकरीत घेऊन तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवींत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. भारतीय संस्कृती कोषात अहिल्यादेवींनी केलेल्या बांधकामांची यादी आहे - काशी, गया, सोमनाथ,अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते.

अहिल्यादेवींनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. त्यांच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याचा मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तक विधानाचा कार्यक्रम स्वतः आयोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा अहेर दिला.

अहिल्यादेवींच्या सन्मानाप्रित्यर्थ व स्मृतिप्रित्यर्थ भारत सरकारने २५ ऑगस्ट १९९६ रोजी एक टपाल तिकिट जारी केले. या अशा शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव देवी अहिल्याबाई विमानतळ असे ठेवण्यात आले आहे. तसेच, इंदूर विद्यापीठास देवी अहिल्या विश्वविद्यालय असे नांव देण्यात आले आहे. इंदूर शहराला सर्व सोयीने उपयुक्त प्रगतिशील असे शहर बनविले. महाराष्ट्रातील सोलापूर विद्यापीठाचे नवीन नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ ठेवण्यात आले आहे. १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने अहिल्यादेवी स्मृतीस अभिवादन म्हणुन पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार महान समाजधुरिण नानाजी देशमुखांना दिला.

अशा सोज्वळ, न्यायप्रिय अहिल्यादेवींना इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी भारताच्या कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारिट असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारिट यांच्याशी तुलना केली आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नांव सर्व प्रथम लिहिले जाईल. ही त्यांच्या चांगुलपणाची पावती म्हणायला हरकत नाही.

या इंदूरमधील शासकांनी, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की, ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्यादेवींना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दूरदूरपर्यंत, रस्त्यांच्या कडेला, दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार, सर्व मिळत होते. बऱ्याच काळापासून, भिल्ल लोक पहाडांतून सामानाची ने-आण करत असतांना चोर व दरोडेखोर त्यांची लूटमार करीत असत. अहिल्याबाईंनी भिल्ल लोकांना त्यापासून मुक्ती मिळवून दिली व प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करीत असे. ***



- प्रविण बागडे,नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-२७ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत डाळिंब पिकासाठी अँटीहेलनेट कव्हर तंत्रज्ञानाच्या लाभासाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावे

सोलापूर : डाळिंब हे महाराष्ट्रातील कोरडवाहू प्रक्षेत्रावर येणारे अतिशय महत्वाचे फळपिक आहे. डाळिंब उत्पादक शेतक-यांना अवकाळी पाऊस, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तींना सतत सामोरे जावे लागते. त्यामुळे शेतक-यांना दर्जेदार व निर्यातक्षम डाळिंब पिकाचे उत्पादन घेण्यास मर्यादा येत आहेत. अवेळी पाऊस व गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीपासून डाळिंब बागांच्या संरक्षणासाठी अँटीहेलनेट कव्हर घटकाचा शासकीय योजनेतर्गत समावेश करण्याबाबत शेतकरी तसेच लोकप्रतिनीधीच्दारे सातत्याने मागणी होती.

सोलापूर जिल्ह्यास सन २०२५-२६ साठी भौतिक ३१.०० हे. व आर्थिक र.रु.१६४.५५ लाख कार्यक्रम राबविण्यास मान्यता मिळाली असून, त्यानूसार राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत डाळिंब पिकासाठी अँटीहेलनेट कव्हर या घटकाची प्रमुख डाळिंब उत्पादक जिल्ह्यामध्ये महाडीबीटी प्रणालीवर अंमलबजावणी करण्यात येत आहे. योजनेचा उद्देश :- गारपीट व अवकाळी पाऊस यापासून डाळिंब बागांचे संरक्षण करणे. शेतक-यांना उच्च दर्जाच्या व उच्च प्रतिच्या निर्यातक्षम डाळिंब पिकांच्या उत्पादनासाठी आर्थिक सहाय्य करणे. फळबागांकरीता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकरीता प्रोत्साहन देणे. ग्रामीण भागातील युवकांना कृषि क्षेत्राल स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे. योजनेची व्याप्ती- डाळिंब उत्पादक १३ जिल्हे अहमदनगर, पुणे, सोलापूर, नाशिक, धुळे, जळगाव,सातारा, सांगली, औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, बुलडाणा क्षेत्र मर्यादा २० गुंटे ते १ एकर दरम्यान प्रति लाभार्थी लाभ देय राहील. खर्चाचे मापदंड रु.४,२४,६४०/- प्रती एकर अनुदान मर्यादा रु.२,१२,३२०/- प्रती एकर (खर्चाच्या ५० टक्के) योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषि विभागाचे संकेस्थळ http://krishi maharashtra.gov.in नजिकच्या कृषि विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

आवश्यक कागदपत्रे ॲग्रीस्टॅक फार्मर आय डी, ७/१२ (डाळिंब पिकाच्या नोंदीसह), ८- अ. आधार कार्डाची छायांकित प्रत, आधार संलग्न बँक खात्याचा पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, जात प्रमाणपत्र (अनु. जाती/ अनु.जमाती शेतक-यांसाठी), विहित नमुन्यातील हमीपत्र, बंधपत्र, चतु:सीमा नकाशा.

योजनेत सहभागी होण्यासाठी सदर घटकाचा लाभ घेण्यासाठी सर्व प्रवर्गातील शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टलवर हींींि:// ारहरवलीं.ारहरीरीहीर.सीं.ळप/ त्रीशी/-सीळडेसळप या संकेस्थळावर जास्तीत जास्त शेतक-यांनी या घटकासाठी अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, शुक्राचार्य भोसले, यांनी केले आहे.



# चातक पक्षाचे सांगोल्यात आगमन



सांगोला : चातक पक्षाचे सांगोल्यात आगमन झाले असून चातक हा स्थलांतर करणारा पक्षी असून मुख्यतः पावसाच्या आगमनाचा संकेत देतो. हा पक्षी पावसाळ्याच्या आधी भारतात येतो आणि मान्सून संपल्यानंतर आफ्रिकेच्या दिशेने स्थलांतर करतो. चातक पक्षाला भारतीय लोकसाहित्य आणि संस्कृतीत विशेष स्थान असलेला पक्षी आहे. याला स्वाभिमानी पक्षी म्हणून ओळखले जाते, कारण तो कोणत्याही जलस्रोताचे पाणी न पिता फक्त पावसाच्या थेंबावर तहान भागवतो, असे मानले जाते. त्याच्या या अद्वितीय स्वभावामुळे तो प्रतीक्षा, चिकाटी आणि निष्ठेचे प्रतीक मानला जातो.

सांगोला सारख्या दुष्काळी प्रदेशात चातक आढळणे हे नवल मानावे लागेल कारण चातक पक्षी पाणथळ प्रदेशात आढळणारा पक्षी आहे. हा पक्षी काळसर रंगाचा असून त्याच्या डोक्यावर एक लांबट शेंडी असते, जी त्याला एक वेगळाच आकर्षक लूक देते. त्याचा आवाज खूप तीव्र आणि वैशिष्ट्यपूर्ण असतो, जो मान्सूनच्या आगमनाचा संकेत म्हणून पाहिला जातो. भारत, आफ्रिका आणि दक्षिण आशियातील काही भागांमध्ये तो आढळतो, विशेषतः पावसाळ्याच्या आधी त्याचे अस्तित्व ठळकपणे जाणवते.चातक हा स्थलांतर करणारा पक्षी असून मुख्यतः पावसाच्या आगमनाचा संकेत देतो. हा पक्षी पावसाळ्याच्या आधी आफ्रिका खंडातून भारतात येतो आणि मान्सून संपल्यानंतर आफ्रिकेच्या दिशेने स्थलांतर करतो.

भारतीय साहित्य आणि कवितांमध्ये चातक पक्षी प्रेम, प्रतीक्षा आणि निष्ठेचे प्रतीक मानला जातो. अनेक कवींनी त्याचा उल्लेख केला आहे, जसे की त्याच्या पावसाची आस पाहण्याची तुलना प्रियकर-प्रेयसीच्या वाट पाहण्याशी केली जाते. त्याच्या चिकाटीच्या स्वभावामुळे तो ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या संयमाचे प्रतीक मानला जातो.

. चातक पक्षी हा निसर्गातील एक सुंदर आणि गूढ जीव आहे, जो फक्त पाण्यासाठीच नव्हे, तर प्रतीक्षा आणि निष्ठेच्या महत्त्वाची आठवण करून देतो. भारतीय संस्कृतीत त्याचा उल्लेख जीवनात चिकाटी आणि धैर्य ठेवण्याच्या प्रेरणादायी रूपात केला जातो.

## खवासपूर येथे अवैध वाळू वाहतूक; ३ लाख ७ हजारांचा मुद्देमाल जप्त

सांगोला : अवैध वाळू वाहतूक करत असताना सांगोला पोलीसांनी ३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची घटना खवासपूर ता.सांगोला येथे घडली.पोलीसांनी ३ लाख रुपये किमतीचा विना नंबरचा टमटम व ७ हजार रुपये किमतीची अंदाजे एक ब्रास वाळु असा एकुण ३ लाख ७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून फिर्याद पोकों लक्ष्मण बापु वाघमोडे यांनी दिली आहे.

सांगोला पोलीसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, दिंनाक २८ मे २०२५ रोजी अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी कटफळ दुरक्षेत्र हद्दित पेट्रोलिंग करीत करीत मौजे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मौजे खवासपुर ते कटफळ जाणाऱ्या रोडवर वाळुची गाडी येणार आहे अशी माहिती मिळाल्यावरुन खवासपुर ते कटफळ जाणाऱ्या रोडवरील महादेव मंदिराजवळ थांबलो असता खवासपुर कडुन एक चारचाकी वाहन येताना दिसले त्यास हात करुन थांबण्याचा इशारा केला त्यावेळी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन रोडच्या कडेला घेवुन थांबवून चालक तेथुन पळुन गेला. त्यानंतर सदर वाहनाजवळ जावुन त्याची पाहणी केली असता सदरचे टमटच्या पाठीमागील हौद्यामध्ये अंदाजे १ ब्रास वाळू भरलेली असल्याचे दिसले. त्यावेळी आम्ही टमटच्या चालकाबाबत आजुबाजुस विचारपुस केली असता त्याचे नाव मिलिंद रणदिवे असे असल्याचे समजले.

त्यानंतर वाळूने भरलेला वाहन पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणेस लावण्यात आला असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये रिक्रुटमेंट पूल कॅम्पसचे आयोजन

सांगोला : सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी मेथवडे या महाविद्यालयात ३० मे रोजी पूल कॅम्पसचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी दिली. डी.फार्मसी, बी.फार्मसी, एम.फार्मसी अंतिम वर्षात शिकत असणारे व पासआऊट उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या पूल कॅम्पससाठी पात्र आहेत.या सह्याद्री पूल कॅम्पसमध्ये एजीवो फार्मासुटिकल पीव्हीटी एलटीडी,पुणे व रिलायन्स फार्मासुटिकल पीव्हीटी एलटीडी मुंबई या दोन फार्मासुटिकल कंपन्यांमार्फत विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया होणार आहे.

प्रोडक्शन एक्झिक्युटिव्ह व क्वालिटी अशुरन्स एक्झिक्युटिव्ह या पदासाठी विद्यार्थ्यांच्या मुलाखती होणार आहेत.सह्याद्री फार्मसी कॉलेज बरोबरच परिसरातील इतर फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी सुद्धा या सह्याद्री पूल कॅम्पसमध्ये सहभागी होऊन मुलाखत देऊ शकणार आहेत. तरी पात्र फार्मसी विद्यार्थ्यांनी या सह्याद्री पूल कॅम्पसमध्ये https:// forms.gle/ ayAxJwut751pCvWr9 या गूगलफॉर्मची लिंक वापरून रेजिस्ट्रेशन करायचे आहे. तरी सर्व पात्र फार्मसी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक सहभाग दर्शवून या कॅम्पसचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले व प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी महाविद्यालय ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागप्रमुख प्रा.एस.एस.काळे (९८२२०४७२३६) व प्रा.एस.पी.जोकार(७२१९५१५९९८) याना सम्पर्क

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा पोषण अभियान : अनुदानावर बियाणे, औषधे व खते महा डीबीटी पोर्टलवर २९ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

सांगोला : राष्ट्रीय अन्न सुरक्षा पोषण अभियान अन्नधान्य पिके सन २०२५-२६ अंतर्गत सुधारीत तंत्रज्ञानावर अधारीत पिक प्रात्यक्षिके, आंतरपीक प्रात्यक्षिके, पिक पध्दतीवर आधारीत पिक प्रात्यक्षिके घटकात तुर, मुग, उडीद, बाजरी, मका, सोयाबीन, ज्वारी, गहू, हरभरा पिकांसाठी अनुदानावर बियाणे व निविष्ठा उपलब्ध होणार आहेत. जिल्हातील सर्वसाधारण, अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती प्रवर्गातील सर्व शेतकरी गटांनी लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर https:// mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर दि २९ मे २०२५ पर्यंत अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

सलग पिक प्रात्यक्षिके (तुर, मुग, उडीद, ) अनुदानाचा दर उच्चतम मर्यादा रु. ९००० प्रती हेक्टर, सलग पिक प्रात्यक्षिके (बाजरी, मका) अनुदानाचा दर उच्चतम मर्यादा रु. ७५०० प्रती हेक्टर, आंतरपिक प्रात्यक्षिके (तुर आंतरपिक सोयाबीन) अनुदानाचा दर उच्चतम मर्यादा रु. ९००० प्रती हेक्टर, पिक पध्दतीवर आधारीत पिक प्रात्यक्षिके (मुग नंतर ज्वारी, मुग नंतर गहू, उडीद नंतर ज्वारी, उडीद नंतर गहू, बाजरी नंतर हरभरा, सोयाबीन नंअतर गहू) अनुदानाचा दर उच्चतम मर्यादा रु. १५००० प्रती हेक्टर, समाविष्ट निविष्ठा- सुधारीत बियाणे, बिजप्रक्रियेसाठी निविष्ठा, सुक्ष्म मुलद्रव्य, पिक संरक्षण औषधे, तणनाशके , प्रगतशील शेतकरी, तंज्ञ मार्गदर्शक यांचे मार्गदर्शन राहिल. पिक प्रात्यक्षिक घटकासाठी पिक प्रात्यक्षिके ही बाब नोंदणीकृत शेतकरी गट , शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था आदीव्दारे करण्यात येईल. पिक प्रात्यक्षीक घटकासाठी अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करताना नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था आदींची निवड प्रथम अर्ज करणा-यास प्रथम प्राधान्यद्वारे करण्यात येईल.

शेतकरी गट हा ३१ मार्च २०२४ पुर्वी नोंदणी केलेला असावा. गटातील शेतक-यांना पीक प्रात्यक्षीकाचा लाभ घेण्यासाठी ग्रीस्टॅग वर नोंदणी असणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी संबंधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

## नॅशनल स्टडी सेंटरच्या दोन विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



सांगोला : नॅशनल स्टडी सेंटरच्या दोन विद्यार्थ्यांनी विविध परीक्षेत यश मिळवल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

नॅशनल स्टडी सेंटर, सांगोला मधील विद्यार्थी श्री. सागर दत्तात्रय बनकर, सांगोला याची शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कुर्ला जिल्हा मुंबई येथे खढ्ढ इन्स्ट्रक्टर पदी, तसेच सचिन महादेव हाके, जवळा ता.सांगोला याची रायगड येथे डीसीसी बँक ज्युनियर क्लर्क पदी मध्ये निवड झाल्याबद्दल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सांगोलाचे प्रभारी प्राचार्य जावेद शिखलगार, व डीसीसी बँक सांगोला चे मॅनेजर श्री.भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना प्राचार्य जावेद शिखलगार यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अनेक जागा शासन भरणार असून येत्या दोन वर्षात विद्यार्थीनी सातत्यपूर्ण अभ्यास करुन यश मिळवावे,तसेच प्रतिकूल परिस्थितीत खढ्ढ इन्स्ट्रक्टर पदी सागर बनकर यांची निवड झाल्याबद्दल कौतुक केले. यावेळी प्रमुख उपस्थिती स्टडी सेंटरचे संचालक रमेश फुले (सर) यांची होती या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अच्युतराव फुले व आभार प्रदर्शन प्रसाद फुले सर यांनी केले.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता